ISSN No-2031-5063 Vol.1,Issue.III/Sept11pp.1-4

Research Paper

भारतीय राज्यघटना व लोकशाही

प्रा . डॉ . हनुमंत भूमकर
ह्यराज्यशास्त्र विभाग प्रमुखह्
के . एस . के . महाविद्यालय बीड

राजकीय दृष्टया लोकशाही म्हणजे अशी राज्यकारभाराची यंत्रणा की जिच्यामध्ये प्रत्येक व्यक्तीचा सहभाग महत्वाचा मानण्यात येतो . डेमॉक्रॉसी ही इंग्लिश संज्ञा दोन ग्रीक शब्दापासून तयार झालेली आहे . *Demos* म्हणजे जनता आणि *Crocia* म्हणजे सत्ता म्हणजेच जनतेची किंवा लोकांची सत्ता लोकशासन प्रकार आजच्या आधुनिक काळात सर्वाधित लोकप्रिय असा लोकशासन प्रकार आहे .

लोकशाहीचा विकास हा अतिप्राचीन काळापासून होत आलेला आहे . प्राचीन ग्रीक नगर राज्यातील नगर राज्य व्यवस्थेपासून ते **20** व्या शतकाच्या आजच्या शेवटच्या टप्प्यात इंग्लड अमेरिका व भारत या सारख्या अनेक देशात जी राज्य पध्दती आहे तिला लोकशाही राज्यपध्दती म्हणतात . लोकशाहीचा आजचा विकास हा हजारो वर्षात झालेला आहे . या पध्दतीत उदा . मानवतावादी तत्वामध्ये जगातील बहुसंख्य राष्ट्रांनी लोकशाही स्वीकारलेली आहे . अमेरिकेचे राष्ट्रअध्यख अब्राहिम लिंकन यांच्या शब्दात लोकांचे लोकांसाठी व लोकांनी चालवलेले सरकार म्हणजे लोकशाही होय . *A Government in which everyone has share) Democracy is the government of the people, for the peple, by the people.*

p`oisaDonT' $Jaovaol'T' लोकशाहीला सकारात्मक शक्ती मानतात त्या शक्तीद्वारे लोकांच्या दैनंदिन व राजकीय गरजा पूर्ण होतात .

जॉन स्टूअर्स मिर्ल लोकशाही अशी शासन पध्दती आहे की जिच्यामध्ये संपूर्ण व बहुतांशी लोक शासन सत्ता स्वतःच निवडून दिलेल्या प्रतिनिधी मार्फत उपभोगतात .

सामाजिक न्याय – लोकशाहीत सामाजिक न्यायाची देखील एक पध्दत असते . माझ्या बायकोने तुझ्या नर्वयाला मारले तेंव्हा तू तिच्या नर्वयाला मार हा जहॉगिरी न्याय म्हणजे न्याय नव्हे . अत्यांतिक दयेची ती एक तात्काकालिक उर्मी होती . सिनेमा काढन्या पुरताच त्याचा उपयोग होतो . त्याच प्रमाणे शतकानुशतके काही जमातींना अन्याय सहन करावा लागला म्हणून काही काळ तरी कथकथीत उच्च वर्गीयाना अन्याय सहन केला पाहिजे ही भूमिका जहॉगिर न्यायाची आहे सामाजिक न्याय पध्दतीची नव्हे . या न्यायामुळे जहॉगीरला चिंरतन प्रसिध्दी मिळाली तशीच लोकप्रियता ही मिळाली . एस . एम . जोशी सरदार पटेल नामदेव ढसाळ प्रकाश आंबेडकर डॉ . लोहिया यांना मागासवर्गीयामध्ये काही काळ उच्च स्थान मिळाले . लोकांनी त्याचा उद्यो उद्यो केला . पण त्याला सामाजिक न्याय म्हणता येणार नाही . सामाजिक न्याय म्हणजे दया त्याग सात्विक संताप किंवा सूड भावना मत्सर उपद्रव वृत्ती विधवंसक वृत्ती यापुर्वी एक किंवा अनेक स्वभाविक प्रेरणा त्या भूमिकेच्या पाठीमागे नसल्या पाहिजेत . त्यामुळे समाजाला योग्य वळण मिळत नाही . अशा परिस्थितीत मागासवर्गीनी आपल्या अस्तीत्वासाठी इतिरिकी संघर्ष करण्याची चेतना दिली जाते . सहाजिकच त्याची प्रतिकिया उच्च वर्गीयात उमटते आणि उच्च वर्गीय ही आत्म रक्षणासाठी कडवे भूमिका घेण्यास सुरूवात करतात त्यातून संघर्ष उभा राहतो . उदासलेल्या पाण्यात मासे मारण्याचा शोक अनेकांना असतो . त्यांना आपण राजकारणी म्हणतो ते या संघर्षाचा फायदा घेऊन अराजक हिंसाचार मारू किंवा मरू ही भाषा काडून आपला राजकीय स्वार्थ साधवण्याच्या मागे असतात ेण त्यातून अखेर सामाजिक न्यायाच्या ऐवजी यादवीच निष्पन्न होते . सामाजिक न्यायासाठी जरूर असते ती स्वभाविक प्रेरणांना समाजाच्या प्रगतीसाठी विद्यायक वळण लावण्याची हे साध्य झाले तर दयेचे रूपांतर सहानुभूती अंधळया त्यागाच्या सवलती संतापाचे किंवा सूट भावनेचे अन्याया विरूध्द लढण्याच्या इर्षेत मत्सराचे निरोगी स्पर्धेत उपद्रव वृत्तीचे अन्याया विरध्द समाजाला संघटीत करण्यात आणि विध्वंशक वृत्तीचे विद्यायक कार्यात रूपांतर होत अशा तंहेचे व्अळण दिल्यानेच मानसिक जागृती होते . आणि सामाजिक जीवनाची पातळी उंचावते . म . गांधीजी म . ज्योतिबा फुले वि . दा . सवरकर डॉ . बा . आंबेडकर अशा अनेक थोर व्यक्तीने केलेल्या कार्यामुळे मागासवर्गीयावर झालेल्या अन्यायाची जाणीव आज सर्वत्र आढळते . या जाणीवेचा फायदा घेऊन सामाजिक न्यायाकडे वाटचाल करावयाची ही तथाकथीत उच्च वर्गीयावर अन्याय करून यादवीची वाट मोकळी करावयाची हा आजच्या समाजापूडील यशप्रश्न आहे . तात्कालीक फायदयासाठी राजकरण्यांना संघर्ष निर्माण करावयाचा आहे तर भारताच्या दिर्घ कालीन हितासाठी सामाजिक न्यायाची आवश्यकता आहे . भारत कोणता मार्ग चोखाळणार आहे यावरच सामाजिक न्यायाची वाटचाल अधोरेखित आहे .

राखीव जागांच्या सर्वच पाठीराखांच्या युक्तीवाद निट तपासून पाहिला तर सहज लक्षात येते की मागासवर्गीयामध्ये जागृती घडून आणून त्यांना सामाजिक न्याय मिळण्यासाठी विधायक कृती करण्या ऐवजी त्यांची महत्वकांक्षा आहे . ती सुसक्षित उच्च पदधिष्ठित महार चांभार वडर निर्माण करण्याची नवा माणूस घडविण्याच्या कल्पनेला ते सर्वस्वी पारखे आहेत . राखीव जागांचा मुल उद्देश ज्यांना आत्मविश्वास नाही जे सर्वस्वी परावलंबी आहेत आणि न्यन गंडाने पछाडलेले आहेत ज्यांचा जीवन संघर्ष इतका जीव घेणा आहे की अधिक चांगल्या जीवनाची कल्पना करण्यासही त्योना वेळ नाही . लाचारीने जगणे एवढेच ज्यांना माहित आहे अशांना स्वाभीमान आणि आत्मविश्वास मिळून देणे . संपन्न जीवनाची त्यात त्यांच्यात आकांक्षा निर्माण करणे आणि त्या स्पर्धेतून अशा संपन्न जीवनाचा लाभ होतो त्या स्पर्धेसाठी मानसिक आणि बौध्दक तयारी करणे . त्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक मदत करणे . आणि सर्व साधारण पातळीवर येण्यासाठी त्यांना सवलती देणे एवढाच असू शकतो . मंडळ आयोगानेही अनुसुचित जाती जमातीसाठीच्या परिवर्तनाच्या सर्व उपयांना सामाजिक स्थरांच्या एढाणेच मार्गकमण करावे लागते असे तेराव्या कलमात सांगितले आहे . उपमाच द्यावयाची म्हटली तर जेथून ते उच्च उडी घेऊन शकतील असा स्प्रिंग बोर्ड त्यांच्यासाठी तयार करणे हे आपले समाजिक कर्तव्य आहे . पण उडी त्यानींच मारावयाची आहे . उध्दार त्यांनीच स्वतः करून घ्यावयाचा आहे . तीही कामगिरी समाजानेक करावयाची व योग्यतेचा विचार न करता अयोग्य व्यक्तींना उच्च व्यक्तींना उच्च पदी पहोचण्याची जवाबदारी समाजाने उचलायची म्हटले तर त्यामुळे सामाजिक –हासाच्या प्रकियेला जलद

गती दिली जाईल . अशाने सामाजिक न्यायाच्या मुल कल्पनेला तिलांजली दिली जाईल .

भारतीय राज्य घटनेच्या कलम **16** ह्य4ह या कलमाने मागासवर्गी साठी सरकारी नौर्कयामध्ये राखीव जागा ठेवण्यास सम्मती दिली आहे . कलम **15** ह्य4ह प्रमाणे सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या वर्गासाठी किंवा अनुसुचित जाती जमातीच्या प्रगतीसाठी खास तरतूद करण्याचे अधिकार राज्याला दिले आहेत . कलम **341** आणि **342** अन्वये अनुसुचित जाती आणि जमाती कोणत्या हे ठरविण्याचा अधिकार राष्ट्रपतींना दिली असून त्यांच्या यादीचा अंतरर्भाव घटनेत करण्यात आला आहे . कलम **330** प्रमाणे सामाजिक आणि आर्थिक दृष्टया मागासलेल्या वर्गाच्या परस्थितीचा अभ्यास करून त्यांच्या स्थितीत सुधारणा घडून आणण्यासाठी उपाय योजना सुचविण्यासाठी आयोग नेमण्याचे अधिकरा राष्ट्रपतींना दिले आहेत . त्याच प्रमाणे मंडल आयोगाची नेमणूक होऊन त्याची कार्यवाही सुरू झाली आहे . अशा प्रकारे भारतीय लोकशाहीत सामाजिक न्यायाच्या दृष्टीने विभागीय पातळीवर **1000** क्षमता असणारे मागासवर्गीय मुला ं मुलींचे वस्तीगृह निर्माण होत आहे . तर जिल्हा पातखीवर **100** क्षमता असणारे मागासवर्गीय मुला ं मुलींचे वस्तीगृह तयार होत आहेत त्यांना राहण्याची व भोजनाची सोय शासनामार्फत देण्यात येत आहे . तसेच शिष्यवृत्तीमध्ये वाढ करून सामाजिक न्यायाच्या दृष्टीने शासनाने समाज कल्याण हा विभाग कार्यरत ठेवला आहे .

यावरून भारतीय लोकशाहीत सामाजिक न्यायाची स्कल्पना तंतोतंत अंमलात आणण्याचा जाणीव पूर्वक प्रयत्न केला जात आहे . यामुळे समाजातील अनुसुचित जाती ं जमाती मागासवर्गीय यांचे कल्याण होत आहे . तसेच आदिवासी जमातीसाठी स्वतंत्र आदिवासी विभाग निर्माण करून त्यांच्या कल्याणाच्या विविध योजना शासनामार्फत राबविण्यात येत आहेत .

निष्कर्ष

1 . राखीव जागांना कोणतीही मुदत असू नये त्यासाठी कुटूंब हा घटक असावा . जो पर्यंत एकही कुटूंब मागासलेले असेल तो पर्यंत राखीव जागा ठेवण्यात याव्यात .

2 . मागासवर्गीच्या सवलतीच्या लाभ ज्या व्यक्तींने घेतला असेल त्यांच्या मुलांना प्रगत ठरवून सवलतीपासून वंचित करण्यात यावे .

3 . दर **10** वर्षांनी जनगणनेच्या वेळी प्रगत कुटूंबाची संख्या लक्षात घेऊन राखीव जागांची टक्केवारी कमी करण्यात यावी .

4 . राखीव जागेसाठी मागासवर्गीय व्यक्ती उपलब्ध नसल्यास ती पदे रिक्त ठेवू नयेत .

5 . राखीव जागा शिरकावच्या ठिकाणीच ठेवाव्यात . पदोन्नतीसाठी जात हाच निकष राहणार नाही .

6 . सर्वच क्षेत्रात राखीव जागा ठेऊनयेत .

असे केले तरच सामाजिक न्यायाच्या दृष्टीने शासन उपयुक्त ठरेल .

संदर्भ

1 . भारतीय राजकीय व्यवस्था ं डॉ . क्षीरसागर

2 . राजकीय सिध्दांत ं शांताराम भोगले

3 . राजकीय विश्लेषण ं वोराळकर

4 . राजकि सिध्दांत ं

डॉ . भा . ला . भोळे

5 . भारतीय लोकशाही

शोध आणि आव्हाने ं अरूण सारथी

6 . मुलभूत राजकीय संकल्पना ं अशोक नाईकवाडे